# चालू घडामोडी - २०२४ ( मार्च )

- महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक आयुक्त अधिकारीपदी एस.चौकलिंगम यांची नियुक्ती करण्यात आली आहे.
- प्रो कबड्डीच्या दहाव्या हंगामात पुणेरी पलटण ने हरियाणा स्टिलर्सला मात देत प्रो कबड्डीच्या विजयाची ट्रॉफी जिंकली आहे.
- भारतात सेमीकंडक्टर तयार करण्यासाठी 'टाटा' गुजरातमध्ये उभारणार पहिला प्लांट.
- भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तमिळनाडू या राज्यात देशातील पहिल्या स्वदेशी ग्रीन हायड्रोजन जल मार्गाचे उद्घाटन केले आहे.
- भारत देश जगातील दुसऱ्या क्रमांकाचा कच्चा पोलाद उत्पादक देश आहे.
- 2023 चा उस्ताद बिस्मिल्ला खाँ युवा पुरस्कार ऋतुजा बागवे या मराठी अभिनेत्रीला जाहीर झाला आहे.
- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते राज्यातील यवतमाळ येथे "पंडित दीनदयाल उपाध्याय" यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण करण्यात आले आहे.
- देशातील पहीले AI केंद्र नागपूर या ठिकाणच्या भारतीय महिती तंत्रज्ञान संस्थेमध्ये स्थापन करण्यात आले आहे.
- 1991 वर्षा पासून दरवर्षी भौतिशास्त्रातील संशोधना जी डी बिर्ला पुरस्कार प्रदान करण्यात येतो. 2023 चा जी डी बिर्ला पुरस्कार 'अदिती सेन डे' यांना जाहीर झाला आहे.

## नोबेल पारितोषिक 2023 विजेते

- भौतिकशास्त्रातील नोबेल पारितोषिक 2023
- 1] फेरेंक क्रॉस्ज
- 2] पियरे एगोस्टिनी
- 3] एनीएल' हुइलिय

- फिजीऑलॉजी किंवा वैद्यकशास्त्रातील नोबेल पारितोषिक 2023
- 1] डू वीसमैन
- 2] कैटालिन कारिको

- रसायनशास्त्रातील नोबेल पारितोषिके 2023
- 1] एलेक्सी एकिमोव
- 2] मौंगी जी बावेंडी
- 3] लुईस ई ब्रूसहुइलियर

- नोबेल शांतता पुरस्कार 2023
- 1] नर्गिस मोहम्मदी

## साहित्यातील नोबेल पारितोषिक 2023

- 1] जॉन फॉसे
- ( मुळात हा पुरस्कार भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, वैद्यकशास्त्र, मानसशास्त्र, साहित्य आणि शांतता या क्षेत्रांत दिला जातो. )

Note :- भारत देशात आतापर्यंत एकूण 10 व्यक्तींना नोबेल पुरस्कार प्राप्त झाला आहे.

- मेघालय राज्यात 'चापचार कुट उत्सव' साजरा करण्यात आला.
- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झारखंडमधील धनबाद येथे 'सिंद्री खत प्रकल्पा'चे उद्घाटन करण्यात आले.
- महाराष्ट्र राज्याच्या अंतरिम अर्थसंकल्पामध्ये राज्यात 'देवनार' येथे लेदर पार्क उभारण्याची घोषणा करण्यात आली आहे..
- विशाखापट्टणम येथे भारत आणि मलेशिया यांच्यात 'समुद्र लक्ष्मण' सरावाचे आयोजन करण्यात आले आहे.
- नरेंद्र मोदी वाराणसीतून तर अमित शाह गांधीनगरमधून 2024 च्या 18 व्या लोकसभा निवडणूक रिंगणात उतरणार आहेत.
- भारत-जपान सैन्याने संयुक्त सराव "धर्म - गार्डियन" युध्दाभ्यास राजयस्थान मध्ये सुरू केला आहे.
- भारतीय रिझर्व्ह बँकेचा 2024 GDP वाढीचा अंदाज 7% आहे
- कोलकाताच्या हुगळी नदीमधील बोगद्यातून धावणाऱ्या देशातील पहिल्या अंडरवॉटर मेट्रोचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे.
- गर्भपाताचा अधिकार आपल्या घटनेत समाविष्ट करणारा फ्रान्स हा जगातील पहिला देश ठरला आहे.
- भारतातील पहिले 'राष्ट्रीय डॉल्फिन संशोधन केंद्र' पाटणा, बिहार येथे स्थापन करण्यात आले आहे.
- झारखंड राज्य सरकार अलीकडेच विधवा पुनर्विवाह प्रोत्साहन योजना सुरू केली आहे
- 7 मार्च हा दिवस भारतात राष्ट्रीय जन औषधी दीन साजरा करण्यात येतो.
- महाराष्ट्र राज्याचे 8 मार्च 2024 ला 4 थे महिला धोरण जाहीर
- स्वत:चा OTT प्लॅटफॉर्म तयार करणारे केरळ हे देशातील पहिले राज्य बनले आहे ( नाव : C-Space)
- नुकतेच पेरू देशात डेंग्यू च्या प्रसारामुळे देशात आरोग्य आणीबाणी जाहीर करण्यात आली आहे.
- अजय माणिकराव खानविलकर यांची भारताचे दुसरे लोकपाल म्हणून नियुक्ती करण्यात आली ( पिनाकी चंद्रघोष - भारताचे पहिले लोकपाल )
- तमिळनाडू मधील कराईवेट्टी अभयारण्याला रामसर स्थळाचा दर्जा ( आता भारतात एकूण 80 रामसर स्थळे झाली आहेत ( भारतात सर्वधिक रामसर स्थळ तमिळनाडू मध्ये 16 आहेत )

- महाराष्ट्रात 3 रामसर स्थळे आहेत. ( नांदूर-मध्यमेश्वर / लोणार सरोवर / ठाणे फ्लेमिंगो अभयारण्य )
- महाराष्ट्र शासनाचा महा गौरव पुरस्कार 2024 हा निखिल वाघ यांना मिळाला आहे
- सुधा मूर्ती यांची राज्यसभेसाठी नामांकन पंतप्रधान मोदींनी आंतरराष्ट्रीय महिला दिनी जाहीर केले.
- तामिळनाडू राज्य सरकारने कुटुंबांच्या उन्नतीसाठी 'नींगल नलामा योजना' सुरू केली आहे.
- यशवंतराव चव्हाण सेंटरचा 2023 चा राष्ट्रीय पुरस्कार सौम्या डॉ. स्वामिनाथन यांना जाहीर झाला आहे.
- रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने IPL 2024 पूर्वी रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू असे आपले नाव बदलले
  बंगळुरू ऐवजी > बेंगळुरू असे नाव
- गोरसम कोरा महोत्सव - भारत आणि भूतान यांच्यातील चिरस्थायी मैत्रीचे प्रतीक असलेला गोरसम कोरा उत्सव 7 मार्च रोजी सुरू झाला आणि या वर्षी 10 मार्च रोजी संपला. ( हे अरुणाचल प्रदेशच्या झेमिथांग व्हॅलीमध्ये न्यानमजांग चू नदीकाठी आयोजित केले जाते.)
- कोचरब आश्रम- दांडी यात्रेच्या 94 व्या वर्धापन दिनानिमित्त पंतप्रधानांनी अलीकडेच गुजरातमधील अहमदाबाद येथे पुनर्विकसित कोचरब आश्रमाचे उद्घाटन केले. ( दक्षिण आफ्रिकेतून भारतात परतल्यानंतर 1915 मध्ये महात्मा गांधींनी स्थापन केलेला हा पहिला आश्रम होता )
- ICC Player of the Month ' फेब्रुवारी महिन्यातील सर्वोत्कृष्ट खेळाडु म्हणुन यशस्वी जयस्वाल याची निवड झाली आहे .
- राम मंदिर ची आरती रोज आता 6.30 ला DD NATIONAL ला दाखवली जाणार आहे
- दरवर्षी मार्च महिन्यातील दुसऱ्या बुधवारी "No smoking day" साजरा करण्यात येतो.
- महाराष्ट्र राज्यात 100 महाविद्यालयात कौशल्य विकास केंद्राची सुरुवात करण्यात येणार आहे.
- ज्ञानेश कुमार आणि सुखबीर सिंह संधू हे निवडणूक आयोगाचे नवे आयुक्त, पंतप्रधानांच्या समितीने केली निवड.
- चंदीगडमध्ये 'खेलो इंडिया रायझिंग टॅलेंट आयडेंटिफिकेशन' (KIRTI) कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले आहे.
- अरुणाचल प्रदेशातील तवांग जिल्ह्यातील गेमिथांग येथे 'गोरसम कोरा महोत्सव' साजरा करण्यात आला.

## 2024 चे काही महत्वाचे विजेते संघ

1. ⭐ खेलो इंडिया पॅरा गेम्स :- हरियाणा
2. ⭐ खेलो इंडिया युथ गेम्स : महाराष्ट्र
3. ⭐ खेलो इंडिया विंटर गेम्स : सेना( Army)
4. ⭐ खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्स: चंदीगड युनिव्हर्सिटी



## निवडणूक आयोग ( केंद्र सरकार )

© ⭐ स्थापना : 25 जानेवारी 1950

© ⭐ सदस्य कार्यकाळ : 6 वर्षे / वयाची 65 वर्षे

© ⭐ सध्याचे मुख्य निवडणूक आयुक्त : राजीव कुमार

© ⭐ पहिले मुख्य निवडणूक आयुक्त : सुकुमार सेन

© ⭐ पहिली महिला निवडणूक आयुक्त : रमा देवी

---

- देशातील सर्वात उंच हवामान टॉवर: भोपाळ मध्ये बनवण्यात आला आहे 72 मीटर उंची आहे
- 2023 पद्मश्री पुरस्कार विजेते कपिलदेव प्रसाद यांचे निधन झाले त्यांच्या बावन बुटी कले बद्दल ( हाताने साडी विणणे) त्यांना पद्मश्री देण्यात आला होता.
- मुंबई संघाने अजिंक्य रहाणे च्या नेतृत्वाखाली 42 व्यांदा रणजी चषक क्रिकेट स्पर्धेचे विजतेपद पटकावले.
- रणजी चषक क्रिकेट स्पर्धा 2023-24 मध्ये तनुष कोटियन ला सर्वोत्तम खेळाडूचा पुरस्कार मिळाला आहे.
- केंद्रीय निवडणूक आयोगाने प्रसिध्द केलेल्या निवडणुक रोख्यांच्या यादीनुसार भाजपा या राजकीय पक्षाला सर्वाधिक देणगी मिळाली आहे. ( बॉन्ड घोटाळा )
- अमेरिकेच्या धर्तिवर भारत आणि ब्राझील या देशात टू प्लस टू चर्चेचे आयोजन करण्यात आले.
- जगातील सर्वात ताकदवान यान स्टारशिप ची यशस्वी चाचणी SPACE- X या खाजगी अवकाश कंपनीने घेतली आहे.
- मानव विकास निर्देशांक 2022 मध्ये 193 देशांच्या यादीत भारत देश 134 व्या क्रमांकावर आहे. ( मानव विकास निर्देशांक UNDP ही संस्था जाहीर करते. )
- किनवट तालुक्यातील भंडारवाडी या गावाची मराठवाड्यातील पहिले मधाचे गाव म्हणून निवड करण्यात आली आहे. ( राज्यातील हे चौथे मधाचे गाव आहे. मांघर / पाटगांव / )
- 'राष्ट्रीय लसीकरण दिन' दरवर्षी 16 मार्च रोजी साजरा केला जातो. (16 मार्च 1955 पासून राष्ट्रीय लसीकरण दिवस साजरा करण्यात येतो आहे. )
- गृह मंत्रालयाने नागरिकत्व सुधारणा कायदा, 2019 अंतर्गत अर्ज करण्यासाठी 'CAA-2019' मोबाइल ॲप लॉंच केले आहे.
- देशभरात सात टप्प्यांत 18 व्या लोकसभेसाठी मतदान होणार आहेत. (18 व्या लोकसभा निवडणुकीमध्ये पाच टप्प्यांत महाराष्ट्रातील 48 जागांसाठी मतदान होणार आहे. )
- समाजसेवेतील अमूल्य योगदानासाठी रतन टाटांचा पी. व्ही नरसिंह राव पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले.

- भारतातील पहिला पाम तेल प्रक्रिया प्रकल्प अरुणाचल प्रदेशमध्ये सुरू झाला आहे.
- चेन्नई सुपकिंग्ज पुरुष IPL संघाचे नेतृत्व (कॅप्टन्सी) ऋतुराज गायकवाड करणार आहे.
- ज्येष्ठ गायिका लता मंगेशकर यांच्या स्मृ िदिनानिमित्त देण्यात येणारा दीदी पुरस्कार विभावरी आपटे यांना प्रदान करण्यात आला आहे.
- आंतरराष्ट्रिय वन दिन 2024 ची थीम " वन आणि नवसंशोधन: चांगल्या जगासाठी नवीन उपाय' आहे.
- ब्राझील देशातील 'रियो डी जेनेरो' येथे या दशकातील सर्वाधिक (62.3°C) तापमानाची नोंद झाली आहे.
- जागतिक आनंदी अहवाल 2024 नुसार 143 देशाच्या यादीत भारताचा 126 वा क्रमांक आहे. ( फिंनलेंड प्रथम क्रमांक)
- मानव तस्करी रोखण्यासाठी राष्ट्रीय महिला आयोगाने "भारतीय रेल्वे" सोबत करार केला आहे.
- 'मेगन' हे चक्रीवादळ ऑस्ट्रेलिया या देशात आले आहे.
- तिसऱ्या लोकशाही परिषदेचे आयोजन दक्षिण कोरिया या देशात करण्यात आले आहे.
- भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भूतान देशाच्या 'ऑर्डर ऑफ द डुक ग्याल्पो' या सर्वोच्च पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. ( पंतप्रधान नरेंद्र मोदी हे भूतान देशाचा सर्वोच्च पुरस्कार मिळणारे पाहिले विदेशी व्यक्ती ठरले आहेत. )
- बिहार राज्यात सुपौल जिल्ह्यात कोशी नदीवर देशातील सर्वात लांब पुल बांधण्यात येत आहे. ( बिहार राज्यात 10.2km लांबीचा देशातील सर्वात लांब पूल बांधण्यात येत आहे. )
- इस्रो कडून भारताच्या पहिल्या पुष्पक या स्वदेशी अवकाश यानाचे दुसऱ्यांदा यशस्वी लँडिंग करण्यात आले आहे. ( इस्रो ने पुष्पक या अवकाश यानाची यशस्वी चाचणी कर्नाटक राज्यातील चीत्रदुर्ग या हवाई तळावरून घेतली आहे. )
- हैती या देशात सुरू असलेल्या हिंसाचारातून भारतीयांची सुटका करण्यासाठी भारत सरकारने 'ऑपरेशन इंद्रावती' राबविण्याचा निर्णय घेतला आहे.
- भारतातील पहिले एकात्मिक तेल पाम प्रक्रिया युनिट अरुणाचल प्रदेश या राज्यात सूरू करण्यात आले आहे.
- त्रीनेत्र 2.0 हे ॲप उत्तर प्रदेश राज्याच्या पोलिस दलाने लाँच केले आहे.
- भारत सरकारने 2025 वर्षापर्यंत क्षयरोग निर्मूलन करण्याचे ध्येय ठेवले आहे.
- आयपीएल क्रिकेट स्पर्धेच्या इतिहासात 900 चौकार आणि षटकार मारणारा शिखर धवन हा पहिला फलंदाज ठरला आहे.
- जगातील सर्वात मोठ्या डॉल्फिन चा सांगाडा पेरू या देशात सापडला आहे.
- भारताचे चांद्रयान-3 यान चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर ज्या ठिकाणी यशस्वी लँडिंग झाले. त्या ठिकाणाला 'शिवशक्ती' नाव देण्यात आले आहे. ( आंतरराष्ट्रिय खगोलशास्त्रीय संघटनेनं मंजुरी दिली. )

## IPL महत्वाचे प्रश्न आणि महत्वाचे रेकॉर्ड

- रोहित शर्मा मुंबई संघाकडून 200 सामने खेळणारा पहिला क्रिकेटपटू ठरला आहे.
- एका संघाकडून 200 आयपीएल सामना खेळणारा रोहित शर्मा हा विराट कोहली (RCB-239) आणि महेंद्रसिंग धोनी (CSK-222) यांच्यानंतरचा तिसरा क्रिकेटपटू ठरला.
- अभिषेक शर्मा हैदराबादकडून केवळ 16 चेंडूत सर्वांत वेगवान अर्धशतक झळकावताना ट्रॅविस हेडचा याच सामन्यातील 18 चेंडूतील विक्रम मोडला
- हार्दिक पांड्या मुंबईकडून 100 षटकार मारणारा किएरॉन पोलार्ड (223), रोहित शर्मा (210) यांच्यानंतरचा तिसरा फलंदाज ठरला.
- हैदराबाद वि. मुंबई लढतीत आयपीएलच्या एका सामन्यातील सर्वाधिक 38 षटकारांचा विक्रम नोंदला गेला.
- IPL मध्ये सर्वाधिक 277 धावा करणारा सनराईज हैदराबाद पहिला संघ ठरला आहे.
- IPL मध्ये SRH संघानंतर सर्वाधिक 263 धावा करणारा रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू हा दुसरा संघ ठरला आहे.
- हैद्राबाद संघाचा खेळाडू अभिषेक शर्मा याने आयपीएल मध्ये सर्वात कमी 16 चेंडूमध्ये अर्धशतक करण्याचा विक्रम केला आहे.

---

- सध्या एका मालवाहू जहाजाच्या धडकेमुळे चर्चेत असलेला फ्रान्सिस स्कॉट की पूल अमेरिका देशात आहे.
- उत्तराखंड राज्यातील चीपको आंदोलनाला 50 वर्षे पूर्ण झाले आहेत.
- भारताच्या लोकपाल पदी नुकतीच ऋतुराज अवस्थी, पंकज कुमार, अजय तिर्की या तीन सदस्यांनी शपथ घेतली.
- इंटरनॅशनल अस्ट्रोलॉजिकल युनिट ने एका लघुग्रहाला जयंत मूर्ती या भारतीय शास्त्रज्ञाचे नाव दिले आहे.
- आयपीएस अधिकारी सदानंद दाते हे NIA मध्ये नियुक्ती झालेले महाराष्ट्र कॅडर चे दुसरे अधिकारी ठरले आहेत. ( आयपीएस अधिकारी सदानंद दाते हे NIA च्या महासंचालक पदावर 2026 पर्यंत राहणार आहेत. )
- विजय जैन यांना प्रतिष्ठित "टाइम्स पॉवर आयकॉन 2024 पुरस्कार"
- सौदी अरेबिया पहिल्यांदा मिस युनिव्हर्स स्पर्धेत सहभागी होणार आहे. ( मिस युनिव्हर्स स्पर्धा 18 सप्टेंबर रोजी मेक्सिकोमध्ये होणार आहे. )
- जमनलाल बजाज फेअर बिझनेस प्रॅक्टीस पुरस्कार हा सन्मान मिळवणारी "पी. एन. जी ज्वेलर्स" महाराष्ट्र राज्यातील पहिली सराफी पेढी ठरली आहे.

- पॅरा पॉवरलिफ्टींग वर्ल्ड कप 2024 चे आयोजन " "या देशात करण्यात आले आहे.
- पॅरा पॉवरलिफ्टींग वर्ल्ड कप 2024 मध्ये भारताच्या विनय कुमार या खेळाडूने 59 वयोगटात सुवर्ण पदक पटकावले आहे.
- 30 मार्च हा दिवस राजस्थान या राज्याचा स्थापना दिन म्हणून साजरा केला जातो.
- आंतरराष्ट्रिय शून्य कचरा दिवस 30 मार्च रोजी साजरा केला जातो.
- स्टार इस्टेटचे व्यवस्थापकीय संचालक श्री विजय जैन यांना प्रतिष्ठित टाइम्स पॉवर आयकॉन 2024 पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.
- भारताचा फुटबॉल पटू सुनिल छेत्री याने भारतासाठी 150 वा अंतरराष्ट्रीय फुटबॉल सामना खेळला आहे.

स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र
ध्येयवेड्या स्पर्धकांना समर्पित ..

शब्दसंकलन - अविनाश चुंबळे

आधिक महितीसाठि संकेतस्थळाला भेट द्या
www.mpscshort.in